# अथ्रव्यवस्थेच्या मूलभूत  समस्या व उपाययोजना

**प्र.२ ख़लील प्रशनंची एक ते दोन वाक्यत उत्तर लिहा**

## २.१ प्रस्तावना

**१. आर्थिक उपक्रमांची नावे सांगा.**

**उत्तर:** उत्पादन, वितरण आणि उपभोग हे आर्थिक उपक्रम आहेत.

## २.२ अर्थव्यवस्थेपुढील मूलभूत समस्या

**२. उपभोग्य वस्तू म्हणजे काय?**

**उत्तर:** उपभोक्त्यांनी आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष वापर करण्याच्या वस्तू म्हणजे उपभोग्य वस्तू होय.
उदा. तांदूळ, गहू, कापड इ.

**३. भांडवली वस्तू म्हणजे काय?**

**उत्तर:** उत्पादकांनी इतर वस्तूंच्या उत्पादनांसाठी अप्रत्यक्षपणे वापर करण्याच्या वस्तू म्हणजे भांडवली वस्तू होय.
उदा. यंत्रसामग्री, अवजारे इ.

**४. 'उत्पादन कसे करावे' ही समस्या कशाशी संबंधित आहे?**

**उत्तर:** 'उत्पादन कसे करावे' ही समस्या वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी कोणत्या तंत्राची निवड करावी याच्याशी संबंधित आहे.

**५. वस्तू व सेवा उत्पादनाच्या दोन तंत्रांची नावे सांगा.**

**उत्तर:** श्रमप्रधान तंत्र आणि भांडवलप्रधान तंत्र ही वस्तू व सेवांच्या उत्पादनाची दोन तंत्रे आहेत.

***६. श्रमप्रधान तंत्र कशास म्हणतात?**

**[ऑक्टोबर १४]**

**किंवा**

**श्रमप्रधान तंत्र स्पष्ट करा** **[जुलै १५]**

**उत्तर:** i. ज्या तंत्रामध्ये वस्तू आणि सेवांच्या उत्पादनासाठी श्रमाचा जास्त व यंत्राचा कमी वापर केला जातो त्या तंत्राला श्रमप्रधान तंत्र असे म्हणतात. उदा. हातमाग उद्योग.

ii. भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्येच्या देशांत श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जातो.

***७. उत्पादनाचे भांडवलप्रधान तंत्र स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. ज्या तंत्रामध्ये वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी श्रमापेक्षा यंत्रसामग्रीचा जास्त वापर केला जातो, त्या तंत्राला उत्पादनाचे भांडवलप्रधान तंत्र म्हणतात. उदा. आधुनिक कापड गिरण्या.

ii. यंत्रसामग्री, श्रम, अवजारे या घटकांची उपलब्धता व त्यांच्या तुलनात्मक किमती यांवर हे तंत्र अवलंबून असते.

**८. उत्पादन तंत्राची निवड कशावर अवलंबून असते?**

**उत्तर:** i. उत्पादन तंत्राची निवड यंत्रसामग्री, श्रम, अवजारे या घटकांची उपलब्धता व त्यांच्या तुलनात्मक किमती यांवर अवलंबून असते.

ii. प्रत्येक देशात उपलब्ध साधनसामग्रीचा कमाल वापर होईल असेच उत्पादन तंत्र स्वीकारले जाते.

**९. भारतामध्ये श्रमप्रधान तंत्राचा वापर का केला जातो?**

**उत्तर:** भारताची लोकसंख्या अतिरिक्त असल्याने श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जातो.

**१०. 'उत्पादन कोणासाठी करावे?' ही समस्या स्पष्ट करा.** **[मार्च १६]**

**उत्तर:** i. 'उत्पादन कोणासाठी करावे' ही समस्या लोकांमध्ये उत्पादनाचे वितरण कसे करावे याच्याशी संबंधित आहे.

ii. अर्थव्यवस्थेत, साधनांची दुर्मीळता यामुळे हा प्रश्न निर्माण होतो.

**११. 'उत्पादन कोणासाठी करावे' या समस्येचा उपाय कशावर अवलंबून आहे?**

**उत्तर:** 'उत्पादन कोणासाठी करावे' या समस्येचा उपाय प्रत्येक अर्थव्यवस्थेच्या सामाजिक व आर्थिक ध्येयधोरणांवर अवलंबून आहे.

**१२. 'उत्पादन किती करावे' या संबंधीचा निर्णय कशावर अवलंबून असतो?**

**उत्तर:** i. 'उत्पादन किती करावे' या संबंधीचा निर्णय लोकसंख्यावाढ, साधनांची उपलब्धता आणि बाजारपेठेचे आकारमान यांवर अवलंबून असतो.

ii. कमाल पातळीपर्यंत उत्पादन वाढवणे हे प्रत्येक अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट असते.

**१३. 'उत्पादन कोणाकडून करावे' ही समस्या कशाशी संबंधित आहे?**

**उत्तर:** i. 'उत्पादन कोणाकडून करावे' ही समस्या अर्थव्यवस्थेतील उत्पादक उपक्रमांचे स्वामित्व आणि नियंत्रण यांच्याशी संबंधित आहे.

ii. उदा. मिश्र अर्थव्यवस्थेत (भारताप्रमाणे), संरक्षण, अणुऊर्जा, रेल्वे यांसारख्या महत्त्वपूर्ण उद्योगांचे स्वामित्व आणि व्यवस्थापन सार्वजनिक क्षेत्राकडे असते, तर उर्वरित उद्योग खाजगी क्षेत्राकडे असतात.

**१४. भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणजे काय?**

**उत्तर:** i. ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादनसाधनांचे स्वामित्व, नियंत्रण आणि व्यवस्थापन खाजगी व्यक्तींद्वारे केले जाते, त्या अर्थव्यवस्थेला भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणतात.

ii. अमेरिका संघराज्य हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे उदाहरण आहे.

**१५. समाजवादी अर्थव्यवस्था म्हणजे काय?**

**उत्तर:** i. ज्या अर्थव्यवस्थेत संपूर्ण उत्पादनाचे व्यवस्थापन आणि नियंत्रण शासनाद्वारे केले जाते, त्या अर्थव्यवस्थेला समाजवादी अर्थव्यवस्था म्हणतात.

ii. चीन हे समाजवादी अर्थव्यवस्थेचे उदाहरण आहे.

**१६. मिश्र अर्थव्यवस्थेत कोणत्या उद्योगांचे स्वामित्व व व्यवस्थापन सार्वजनिक क्षेत्राकडे असते?**

**उत्तर:** i. मिश्र अर्थव्यवस्थेत संरक्षण, अणुऊर्जा, रेल्वे यांसारख्या महत्त्वपूर्ण उद्योगांचे स्वामित्व व व्यवस्थापन सार्वजनिक क्षेत्राकडे असते.

ii. भारत हे मिश्र अर्थव्यवस्थेचे उदाहरण आहे.

**१७. 'साधनसामग्रीचा कितपत कार्यक्षम वापर होत आहे' या समस्येमध्ये कशाचा समावेश होतो?**

**उत्तर:** i. 'साधनसामग्रीचा कितपत कार्यक्षम वापर होत आहे' या समस्येमध्ये साधनसामग्रीचे कार्यक्षम विभाजन व त्यांचा योग्य वापर यांचा समावेश होतो.

ii. अर्थव्यवस्थेतील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी त्याचा उपयोग होतो.

**१८. एकूण उत्पादन सर्वाधिक होण्यासाठी उपलब्ध साधनांचा वापर कसा केला जातो?**

**उत्तर:** i. विविध उत्पादक उपक्रमांमध्ये उपलब्ध साधनांचे विभाजन अशा रीतीने करतात की जेणेकरून एकूण उत्पादन सर्वाधिक होईल.

ii. यामुळे उपलब्ध साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर करता येतो.

**१९. उपलब्ध साधनांचा अपुरा किंवा अयोग्य वापर झाल्यास काय होऊ शकते?**

**उत्तर:** उपलब्ध साधनांचा अपुरा किंवा अयोग्य वापर झाल्यास एकूण उत्पादन पूर्ण क्षमतेपेक्षा कमी होते.

## २.३ उपाय

**२०. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादक अतिशय कार्यक्षम उत्पादन तंत्र का स्वीकारतात?**

**उत्तर:** महत्तम नफा मिळण्यासाठी भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादक अतिशय कार्यक्षम उत्पादन तंत्र स्वीकारतात.

**२१. भांडवलशाही अर्थव्यवस्था स्वीकारलेल्या देशाचे नाव सांगा.**

**उत्तर:** अमेरिकन संघराज्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्था स्वीकारली आहे.

***२२. मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे काय? [मार्च १४]**

**उत्तर:**
i. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी या दोन्ही क्षेत्रांचे सह-अस्तित्व असते.

ii. सार्वजनिक क्षेत्रांची मालकी व व्यवस्थापन शासनाकडे असते (उदा. रेल्वे, संरक्षण, अणुऊर्जा इ.) तर खाजगी क्षेत्राची मालकी व त्याचे व्यवस्थापन खाजगी व्यक्तींकडे असते (उदा. शेती).

iii. भारताने आपल्या मूलभूत आर्थिक समस्या सोडवण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली आहे.

**२३. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्रासंबंधीचे निर्णय कोणाद्वारे घेतले जातात?**

**उत्तर:** मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्रासंबंधीचे निर्णय शासन व नियोजन मंडळाद्वारे घेतले जातात.

## २४. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील फरक सांगा.

उत्तर:

| क्र. | खाजगी क्षेत्र | सार्वजनिक क्षेत्र |
|---|---|---|
| i. | खाजगी क्षेत्राची मालकी व त्याचे व्यवस्थापन खाजगी व्यक्तींकडे असते. | सार्वजनिक क्षेत्राची मालकी व त्याचे व्यवस्थापन शासनाकडे असते. |
| ii. | येथे, जास्तीत जास्त नफा या तत्त्वावर वस्तू आणि सेवांचे उत्पादन व त्यांचा पुरवठा केला जातो. | येथे, 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर वस्तू आणि/किंवा सेवांचे उत्पादन व/किंवा पुरवठा केला जातो. |
| iii. | खाजगी क्षेत्राचे निर्णय खाजगी व्यक्तींकडून घेतले जातात. | सार्वजनिक क्षेत्रासंबंधीचे निर्णय शासन आणि नियोजन मंडळाद्वारे घेतले जातात. |

## प्र.३. पुढील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यांत उत्तरे लिहा.

### २.२ अर्थव्यवस्थेपुढील मूलभूत समस्या

***१. 'उत्पादन कशाचे करावे' ही समस्या स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. 'उत्पादन कशाचे करावे' ही समस्या उत्पादन करावयाच्या वस्तू आणि सेवांच्या निवडीशी संबंधित आहे.

ii. तांदूळ, गहू, कापड अशा उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करावे, की यंत्रे, अवजारे अशा भांडवली वस्तूंचे उत्पादन करावे हे प्रत्येक अर्थव्यवस्थेला ठरवावे लागते.

iii. तसेच, जीवनावश्यक वस्तू आणि चैनीच्या वस्तू यातूनही अर्थव्यवस्थेला निवड करावी लागते.

iv. सामान्यपणे, जास्तीत जास्त उपभोग घेतल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांच्या उत्पादनाला प्राधान्य दिले जाते.

**२. 'उत्पादन कसे करावे' ही समस्या स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. 'उत्पादन कसे करावे' ही समस्या वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी कोणत्या तंत्राची निवड करावी याच्याशी संबंधित आहे.

ii. उत्पादनाची दोन तंत्रे आहेत – श्रमप्रधान तंत्र व भांडवलप्रधान तंत्र.

iii. श्रमप्रधान तंत्रामध्ये श्रमाचा जास्त व यंत्राचा कमी वापर केला जातो, तर भांडवलप्रधान तंत्रामध्ये श्रमापेक्षा यंत्रसामग्रीचा जास्त वापर केला जातो.

iv. यंत्रसामग्री, श्रम, अवजारे या घटकांची उपलब्धता व त्यांच्या तुलनात्मक किमती यांवर उत्पादन तंत्राची निवड अवलंबून असते.

v. प्रत्येक देश उपलब्ध साधनसामग्रीचा कमाल वापर होईल अशाच उत्पादन तंत्राचा स्वीकार करतो.

vi. भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्येच्या देशात श्रमप्रधान तंत्र वापरले जाते.

३. **'उत्पादन किती करावे' ही समस्या स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. 'उत्पादन किती करावे' या संबंधीचा निर्णय लोकसंख्यावाढ, साधनांची उपलब्धता आणि बाजारपेठेचे आकारमान यांवर अवलंबून असतो.

ii. कमाल पातळीपर्यंत उत्पादन वाढवणे हे प्रत्येक अर्थव्यवस्थेचे उद्‌दिष्ट असते.

iii. जास्त लोकसंख्या असणाऱ्या देशाला जास्त उत्पादनाची आवश्यकता असते.

iv. उत्पादनपातळी साधनांच्या उपलब्धतेनुसार निश्चित होते.

४. **'उत्पादन कोणाकडून करावे' ही समस्या स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. 'उत्पादन कोणाकडून करावे' ही समस्या अर्थव्यवस्थेतील उत्पादक उपक्रमांचे स्वामित्व आणि नियंत्रण यांच्याशी निगडित आहे.

ii. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत, उत्पादनसाधनांचे स्वामित्व, नियंत्रण आणि व्यवस्थापन खाजगी व्यक्तींद्‌वारे केले जाते.

iii. समाजवादी अर्थव्यवस्थेत, संपूर्ण उत्पादनाचे व्यवस्थापन व नियंत्रण शासनाद्‌वारे केले जाते.

iv. मिश्र अर्थव्यवस्थेत संरक्षण, अणुऊर्जा, रेल्वे यांसारख्या महत्त्वपूर्ण उद्योगांचे स्वामित्व आणि व्यवस्थापन सार्वजनिक क्षेत्राकडे असते, तर उर्वरित उद्योगांचे व्यवस्थापन व स्वामित्व खाजगी क्षेत्राकडे असते.

**५. 'साधनसामग्रीचा कितपत कार्यक्षम वापर होत आहे' ही समस्या स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. 'साधनसामग्रीचा कितपत कार्यक्षम वापर होत आहे' या प्रश्नामध्ये साधनसामग्रीचे कार्यक्षम विभाजन व त्यांचा योग्य वापर यांचा समावेश होतो.

ii. विकासाचा उच्चतम दर गाठण्यासाठी साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर होणे अत्यंत महत्त्वाचे असते.

iii. म्हणून, विविध उत्पादक उपक्रमांमध्ये उपलब्ध साधनांचे विभाजन अशा रीतीने झाले पाहिजे, जेणेकरून एकूण उत्पादन सर्वाधिक होईल.

iv. साधनांचा अपुरा किंवा अयोग्य वापर होतो तेव्हा एकूण उत्पादन पूर्ण क्षमतेपेक्षा कमी होते.

v. त्यामुळे असे म्हणता येते की, उपलब्ध साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर, अर्थव्यवस्थेतील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी उपयुक्त ठरतो.

## २.३ उपाय

***६. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मूलभूत आर्थिक समस्या कशा सोडवल्या जातात?**

**उत्तर:** i. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत काय आणि किती खरेदी करावे याच्या निवडीचे स्वातंत्र्य उपभोक्त्याला असते.

ii. उत्पादकाला व्यावसायिक स्वातंत्र्य असते.

iii. उत्पादन आणि वितरणासंबंधीचे निर्णय हे मागणी व पुरवठ्यातील बदलांनुसार घेतले जातात.

iv. उत्पादक, महत्तम नफा मिळण्यासाठी अतिशय कार्यक्षम उत्पादन तंत्र स्वीकारतात.

v. आर्थिक उपक्रम राबवताना सरकारी हस्तक्षेप नसतो.

***७. समाजवादी अर्थव्यवस्था स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनासंबंधीचे निर्णय शासनाद्वारे घेतले जातात.

ii. हे निर्णय केंद्रीय नियोजन मंडळाने निश्चित केलेली उद्दिष्टे व त्यांचे प्राधान्यक्रम यांवर अवलंबून असतात.

iii. येथे, उपभोक्त्याला निवडीचे स्वातंत्र्य नसते.

iv. महत्तम सामाजिक कल्याण साधण्यासाठी गरजांना अनुसरून वस्तूंचे वितरण केले जाते.

**८. मिश्र अर्थव्यवस्थेत मूलभूत आर्थिक समस्या कशा सोडविल्या जातात?**

**उत्तर:** i. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राचे सह-अस्तित्व असते.

ii. सार्वजनिक क्षेत्राची मालकी व व्यवस्थापन शासनाकडे असते, तर खाजगी क्षेत्राची मालकी व व्यवस्थापन खाजगी व्यक्तींकडे असते.

iii. सार्वजनिक क्षेत्राद्वारे वस्तू आणि सेवांचे उत्पादन व पुरवठा 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर केला जातो.

iv. खाजगी क्षेत्राचे निर्णय 'महत्तम नफा मिळवणे' या तत्त्वावर आधारित असतात.

येथे शासन जनहित लक्षात घेऊन वस्तू आणि सेवांचे असे वितरण करते, की त्यांच्या उपभोगापासून कोणीही वंचित राहणार नाही.